GRT
Golden Research Thoughts
ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

स्त्रीवादी चळवळ दिशा आणि दशा

प्रा. गायत्री सोपान गाडेकर
मराठी विभाग , स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई.

प्रस्तावना

मराठी साहित्यात १९६० नंतर विविध साहित्य चळवळी निर्माण झाल्या. ग्रामीण साहित्य चळवळ, दलित साहित्य चळवळ, आदिवासी साहित्य चळवळ, विमुक्त भटक्या साहित्याची चळवळ, कामगार साहित्य चळवळ इत्यादी साहित्य चळवळींनी १९६० नंतर महाराष्ट्राच्या समाजजीवनावर फार मोठा प्रभाव टाकून आपले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न केले. स्वातंत्र्योत्तर काळातील शोषितांच्या चळवळीचे हे साहित्य असल्याने शोषणातून मुक्त होण्यासाठी साहित्य चळवळीच्या माध्यमातून या स्त्रीवादी चळवळीने जोमाने पाऊल टाकले. स्त्री ही जगाच्या पाठीवर कायम शोषीत, उपेक्षित, वंचित असणारी समाजाचा घटक आहे. मातृसत्ताक कुटुंबपध्दतीच्या ऱ्हासानंतर स्त्रीची अवहेलना झाली. आजही मोठ्या प्रमाणात होत आहे. तिला तिचे हक्क मिळावे, तिच्या अस्तित्वाचा व अस्मितेचा विचार व्हावा, देवत्वाच्या बिरुदातून तिची सुटका व्हावी. मानवाप्रमाणे तिला वागणुक मिळावी यासाठी स्त्रीवादी चळवळ १९६० नंतर जन्माला जरी आली तरी तिचे बीज आपल्याला प्राचीन काळात वघावयास मिळते.

१. स्त्रीवादी चळवळीचा उगम :

भारतात स्त्रीवादी चळवळीच्या उगमाचा विचार केल्यास असे प्रत्ययास येते की; इ.स. पूर्व सहाव्या शतकात गौतम बुध्दांनी स्त्री विकासाला चालना दिली. 'स्वतःच स्वयंप्रकाशित व्हा' असा मोलाचा सल्ला दिला. बौध्द भिक्खूंनी आपले अनुभव थेरीगाथेत समाविष्ट केलेले आहे. तर सातवाहन काळात 'गाथासप्तशतीमध्ये' अनेक स्त्रियांनी कवने रचलेली आढळून येतात. संतसाहित्यात अक्कमहादेवी सोयराबाई, विठाबाई, मीराबाई, लल्लेश्वरी, जनाबाई, बहिणाबाई, वेणाबाई यांच्या लेखनातून क्रांतिकारी विचारांचा प्रत्यय येतो.

जनाबाई आपल्या अभंगात म्हणतात

"डोईचा पदर आला खांद्यावरती
भरल्या बाजारी जाईन मी "

असा संत साहित्यात एक परिवर्तनाचा सूर जनाबाईंच्या अभंगाच्या माध्यमातून येतांना दिसली. तर स्त्रीमुक्तीच्या उद्‌गारल्या महदंबा, निर्मला, सोयराबाई, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, मनोरमा मेघावी, लक्ष्मीबाई टिळक, काशीबाई कानेटकर, आनंदीबाई कर्वे, पार्वतीबाई आठवले, रखमाबाई जनाक्का शिंदे, कमलाताई होस्पेट यांनी आधुनिक काळात चरित्र व आत्मचरित्राच्या माध्यमातून क्रांतिकारी विचार मांडले.

त्यानंतर गांधीजींनी स्वातंत्र्या साठी स्त्रियांना केलेले आवाहन, समाजसुधारकांनी रुढी परंपरेचा नायनाट करण्यासाठी केलेले प्रयत्न, शैक्षणिक संस्था व विद्यापीठाची स्थापना, अखिल भारतीय महिला परिषद, स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समितीची स्थापना या चळवळीमधून स्त्रिया पुढे आल्या व आपल्या हक्कासाठी लढू लागल्या.

अशीच परिस्थिती परदेशातील स्त्रियांची होती ; पण अन्यायाचा प्रकार वेगळा होता. ऑलिम्पी डी गॉगिस या फ्रांसमधील स्त्रीने स्त्री हक्काचा प्रसिध्द केलेला जाहिरनामा, अमेरिकेतील 'लक्झ ेंबर्ग' यांच्या सांगण्यानुसार १० तासांच्या दिवसांसाठी पुकारलेला संप, क्लारा झेटकीन यांच्या नेतृत्वाखाली जर्मनीच्या युध्दखोर धोरणाचा निषेध, व्हिएतनाममधील, सरंजामशाहीला कंटाळून बंड करणाऱ्या स्त्रिया, १८८० ला ॲनी, फ्रकहर्ट या स्त्रीने सफ्रेजेट चळवळीच्या माध्यमातून स्त्रियांच्या मताधिकाराची केलेली मागणी या सर्व चळवळींमध्ये स्त्रिया आपल्या हक्कासाठी, न्यायासाठी, अस्तित्वासाठी, अस्मितेसाठी लढल्या. याचा प्रभाव भारतीय स्त्रियांवर पडला. म्हणून स्त्रीवादी चळवळीचे बीज जरी बुध्द, संत काळात असले तरी स्त्रीवादी साहित्य संकल्पना ब्रिटीश आणि अमेरिकन स्त्रीवादी चळवळीतून आणि साहित्यातून आपल्याकडे आली व तत्कालीन परिस्थितीला अनुसरून आपण ती स्वीकारली त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलाने स्त्रीवादी चळवळीला बळकटी आली आणि त्यामुळे स्त्रीवादी साहित्याच्या चळवळीच्या माध्यमातून आपले विचार व भूमिका यात परिवर्तन केले आहे. आता गरज आहे पुरुषांनी आपल्या मानसिकतेत बदल

घडवून आणण्याची त्यासाठी स्त्रीवादी चळवळ जन्माला आली आहे. त्या अनुषंगाने स्त्रीवाद म्हणजे काय ते पाहु.

२. स्त्रीवादी चळवळीची संकल्पना व स्वरुप :

स्त्रीवादामध्ये वेगवेगळ्या परंपरा व वेगवेगळ्या तज्ञांनी केलेले तात्विक विवेचन असल्यामुळे स्त्रीवादाची व्याख्या अनेक प्रकारांनी केल्या जाते.

१.स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांचे राजकीय आणि वैधानिक कायदेशीर हक्क, समान संधी, समान स्थान, गर्भपात, कुटुंब नियोजन इत्यादी बाबतीत स्वयंनिर्णयाचा अधिकार, स्वतःच्या शरीरावर स्वतःचा अधिकार इत्यादीसाठी झालेल्या व होत असलेल्या चळवळींचाही समावेश स्त्रीवादाच्या व्याख्येत होतो- शारदा साठे

२.मानवी इतिहासाच्या जडण-घडणीत पुरुषांपेक्षा स्त्रियांना दुय्यम स्थान का ? आणि कसे आले ? याचे विश्लेषण, स्पष्टीकरण व ते नष्ट करण्यासाठी अवलंबण्याचे मार्ग, आव्हाने चळवळी यांची मांडणी व अभ्यास म्हणजे स्त्रीवाद होय- पद्मजा पाटील, शोभना जाधव.

याचाच अर्थ स्त्रीवाद ही एक संकल्पना आहे. स्त्रियांच्या चळवळीचा संदर्भ आणि त्यातील वैचारिक केंद्र म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीच्या दृष्टिकोनातून जीवनाच्या अनेक पैलूंकडे पाहणे म्हणजे स्त्रीवाद. पुरुषप्रधान संस्कृतीच्या विरोधात उठलेला तो आवाज आहे. ती जशी वृत्ती आहे तशी ती कृतीही आहे. स्त्रीवाद माणूस म्हणून जगण्याची एक चळवळ आहे. तो स्वतःचा माणूस म्हणून जगण्याचा व शोध घेण्याचा संघर्ष आहे. सामाजिक, राजकीय, मानसिक, आर्थिक समानतेचा हा लढा पारंपारिक जसा आहे तसा तो जागतिक संघर्ष ही आहे. स्त्रीच्या स्वयंसिध्द अस्तित्वाची नांदी म्हणजे स्त्रीवाद. स्त्रीचे मूलभूत स्वातंत्र्य म्हणजे स्त्रीवाद, स्त्रीची अस्मिता म्हणजे स्त्रीवाद. स्त्रीवाद फक्त स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाचाच पुरस्कार करीत नाही तर स्त्री-पुरुष समानतेचाही विचार करतो. लैंगिक भेदावर आधारलेल्या समाजव्यवस्थेत स्त्री व पुरुषांना त्यांचे स्वतंत्र व स्वायत्त अधिकार मिळविण्यासाठी कटिबध्द असतो तो स्त्रीवाद. असे स्त्रीवादी चळवळीचे स्वरुप सांगता येईल.

३. स्त्रीवादी चळवळीच्या प्रेरणा :

भारतात इ.स. पूर्वपासून स्त्रीवादी विचारसरणीच्या चळवळीचा प्रत्यय आपणास येतो. आजच्या काळाच्या तुलनेत प्राचीन स्त्रीवादी चळवळीचा विचार हा क्षीण होता. व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना त्या काळात फारशी रुजलेली नव्हती; पण १९६० नंतर आपण ब्रिटीश व अमेरिकन यांच्या चळवळीतून व साहित्यातून स्त्रीवादी विचार जाणीवपूर्वक व तत्कालीन परिस्थितीला अनुसरून स्वीकारला. त्यानंतर समता, स्वातंत्र्य, न्याय, समान हक्क, नव-निर्मितीतील सहभाग या पंचसूत्रीच्या द्वारे आपण भारतातील चळवळी व साहित्यातून त्यांची परंपरा शोधण्याचा प्रयत्न केला तेव्हां भारतातच ही संकल्पना प्रत्ययास असल्याचे जाणवले; पण पश्चिमात्यांनी ती जाणीव व दृष्टी आपल्याला दिल्यामुळे स्त्रीवादी संकल्पनेचे प्रेरणास्थान आपण पाश्चात्य मानतो.

४. स्त्रीवाद ही एक मानवमुक्तीची चळवळ :

स्त्री चळवळ गांधीजींनी स्वातंत्र्यासाठी केलेल्या आवाहनामुळे संघटीत झाली. राजकीय लढ्यातील सहभागामुळे तिच्या सामाजिक सुधारणेला गती मिळाली. स्त्रियांच्या अन्यायाच्या विरोधात वूमन्स इंडियन असोसिएशन (WIA) १९९७ मध्ये 'अखिल भारतीय महिला परिषद' (AIWC) ही संस्था १९२७ मध्ये स्थापन करण्यात आली. त्यादृष्टीने स्त्रियांच्या विकासासाठी प्रयत्न केल्या जाऊ लागले. त्यामुळे स्त्रीवादी चळवळीचे मूलभूत प्रश्न जगासमोर आले. तळागाळातील स्त्रियांमध्ये जागृती आली. स्त्रीच्या जगण्याला एक नवीन दृष्टी आली. तिच्या भावना, तिचे विचार तिच्या समस्या याकडे चळवळीने विशेष लक्ष दिले.

स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला प्रतिबंध, स्त्रियांमध्ये आत्मविश्वास, स्वयंनिर्णयाची ताकद, शिक्षण, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी, समानता, विवाहानंतर पतीच्या मालमत्तेवर हक्क, वारसा हक्क, समानसंधी, जगण्याचा हक्क, देवदासी, विधवा पुर्नविवाह याबद्दल स्त्रीवादी चळवळीने आपले पाऊल उचलले.

स्त्रीवादी चळवळ हे पाश्चात्यांचे आंधळे अनुकरण नाही. पुरुषविरोधी चळवळही नाही तर शारदा साठे स्त्रीवादी चळवळीचा अर्थ 'स्त्रीवाद सर्वांग परिपूर्ण तत्वज्ञान नव्हे' या लेखात सांगतांना म्हणतात, "स्त्रीवादी चळवळ म्हणजे मानवमुक्तीच्या चळवळीतील तो एक प्रवाह आहे. तो बाजूला काढता येत नाही. शरीरात जसे रक्त तशी स्त्रीवादी चळवळ आहे". भारतात स्त्रीवादी चळवळ ही मानवमुक्तीची चळवळ आहे. स्त्रीचा माणूस म्हणून स्वीकार केल्या जावा. त्यादृष्टीने भारतात चळवळी निर्माण होवून आपल्या हक्कासाठी, न्यायासाठी, अस्तित्वासाठी त्या लढल्या त्यात खालील चळवळींचा समावेश होतो.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन, महागाई विरोधात मोर्चा, रोजगार हमी योजना, लाटणे मोर्चा, सरकारी अधिकारी, मंत्री व्यापाऱ्यांना घेराव मुख्यमंत्री व अन्नपुरवठा मंत्र्यांची कचरातुला, औरंगाबाद विद्यापीठ नामांतराच्या चळवळीत महिलांचे योगदान, सरकारी नोकरीत ३० टक्के आरक्षण, एन.टी. रामाराव यांच्या कारकिर्दित स्त्रियांना वारसाहक्क, मंजुश्री सारडा खून खटला, चिपको

आंदोलन, ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, इंधन इत्यादी बाबतीत स्त्रीवादी चळवळीने लढा उभारुन लिंगभेदावर, पिळवणुकीवर आधारीत असणारी श्रमविभागणी धुडकावून लावून स्त्रीला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

५. स्त्रीवादी चळवळ आणि स्त्रींचे स्वतंत्र अस्तित्व :

प्राचीन काळापासून श्रमविभाजन, असुरक्षिततेचे भय, पुरुषी वर्चस्व, धर्माचे अवडंबर यामुळे स्त्री पुरुषांची गुलाम झाली, तिला स्वतंत्र्य अस्तित्व राहिले नाही. पिता, पुत्र, बंधू, धर्म यांच्या बंधनात ती राहिली. त्यामुळे तिचा कोणत्याच क्षेत्रात सर्वांगीण विकास झाला नाही. आपले जीवन हे असेच आहे हीच भावना तिच्या मनात पक्की रुजली, गांधी फुले, आगरकर, कर्वे यांच्या कार्यामुळे स्त्री माजघरातुन उंबरठ्याबाहेर पाऊल टाकू लागली.

विज्ञान, तंत्रज्ञान, कला, वांङमय, चित्रपट, रंगभूमी, अंतराळ या प्रत्येक ठिकाणी स्त्री कर्तबगारी दाखवू लागली. हे कार्य करतांना प्रतिकूल, परिस्थितीला ती तोंड देत होती. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी स्त्री झाली. पण तिच्या पगारावर तिचा हक्क नाही. राजकारणातील महत्त्वाचे पद नाही. प्रमुखपद क्वचित आल्यास हार तुरे व खुर्चीचा मानकरी पुरुष, स्त्रीला नोकरी करण्याचे स्वातंत्र्य नाही. दूरच्या ठिकाणी नोकरी असेल तर ती सोडायला लावणार त्यामुळे तिचा मानसिक कोंडमारा होऊ लागला. तिच्या अस्तित्वाचा, शिक्षणाचा उपयोग पुरुषांच्या दृष्टीने शून्य ठरू लागला. तिला तिच्या आवडीनुसार व्यवसाय नोकरी करण्यावर प्रतिबंध घातल्या जाऊ लागल्याने तिच्या स्वातंत्र्यावर गदा आली.

या विरोधात परिवर्तन आणण्यासाठी स्त्रीला तिचे हक्क, स्वातंत्र्य, मिळवण्यासाठी आत्मभानासाठी, अस्तित्वासाठी, अस्मितेसाठी न्यायासाठी, समानतेसाठी स्त्रीवादी चळवळ स्त्रीला प्रोत्साहित करीत आहे.

स्त्रीला माणूस म्हणून वागविले जावे, सर्वच क्षेत्रात तिचा सहभाग असावा, निर्णयस्वातंत्र्य, मतदानाचा हक्क, स्त्रीभ्रूण हत्या व हुंड्यासारख्या प्रथेला प्रतिबंध घातल्या जावा. सर्वांगीण स्वातंत्र्य तिला मिळावे म्हणून स्त्रीवादी चळवळ प्रयत्नशील आहे. विवाहस्वातंत्र्य, शिक्षणाचे स्वातंत्र्य, वर निवडण्याचे स्वातंत्र्य, वारसा हक्क, संपत्तीत समान हक्क या गोष्टींवर स्त्रीवादी चळवळीचा भर आहे.

६. स्त्री-पुरुष समानतेचा विचार :

भारतीय समाजव्यवस्थेचा अभ्यास केल्यास असे दिसते की, स्त्रीच्या जन्माचे आनंदाने स्वागत होत नाही. 'परक्याने धन' म्हणून तिला वाढविले जाते. तिला शिक्षणापासून वंचित ठेवले जाते. स्त्री-पुरुष हा भेद करुन तिच्या सर्वांगीण विकासाठी प्रयत्न केल्या जात नाही. भ्रूणहत्या करुन तिचे अस्तित्व संपवून टाकले जाते, नाहीतर हुंड्यासाठी छळ करुन मारुन टाकले जाते किंवा आत्महत्येसाठी प्रवृत्त केले जाते. स्त्री एक उपभोगाचे साधन, हक्काची मोलकरीण या दृष्टीने पाहिले जाते. विधवा, निपुत्रिक स्त्रीला घटस्फोटिता, परित्यक्ता, प्रौढ कुमारी अशा स्त्रियांना कमी लेखल्या जाते. विधवेला, निपुत्रिक पुनर्विवाह करण्यावर बंदी, पण पुरुष मात्र पत्नी मेल्यास लगेच विवाहबध्द होतो. अशी दुय्यम वागणूक स्त्रीला मिळते. स्त्रीवर अत्याचार झाल्यास स्त्रीला दोषी ठरतात; पण पुरुष मात्र निर्दोष सुटतो. पुरुषाचे समाजात स्थान त्याच्या कर्तृत्वावरुन व स्त्रीचे विवाहावरुन ठरते. विवाहामुळे पुरुषांच्या पदोन्नतीमध्ये फरक पडत नाही. स्त्रीच्या पदोन्नतीमध्ये मात्र फरक पडतो. स्त्रीवादी चळवळ स्त्रीजन्माचे स्वागत करते. तिच्या सर्वांगीण विकासावर भर देते. समान हक्क, अधिकार, समान संधी, आर्थिकदृष्ट्या सक्षम, स्त्रीच्या मालकीचे घर, सातबाऱ्याच्या उताऱ्यावर स्त्रीचे नाव, उच्च अधिकाराच्या जागी स्त्रीची नेमणूक, स्त्रीला मूल दत्तक घेण्याचा व संन्यास घेण्याचा अधिकार, अंत्यष्टीचे अधिकार, निर्णयप्रक्रियेत स्वातंत्र्य, राजकारण, धार्मिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कौटुंबिक न्यायव्यवस्थेत स्त्रीला समान अधिकार या सर्व बाबींचा स्त्रीवादी चळवळ हिरिरीने पुरस्कार करते. स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडतांना दादा धर्माधिकारी म्हणतात "समाजात स्त्री पुरुषांमध्ये मैत्रीचे संबंध वाढले पाहिजे. शेकडो वर्षानंतर गांधीजीच पहिला पुरुष झाला असावा. ज्याने आपल्या जीवनात दोन्ही प्रकारचे प्रयोग केले. स्त्री आणि पुरुष एकमेकांबरोबर सख्याच्या तूल्य भूमिकेवर राहू शकतात हे सिध्द करण्याचा त्यांना प्रत्यत्न केला. सामाजिक क्षेत्रात या तथ्याचा स्वीकार केला नाही. तर स्त्रीचे मानवत्व गौण आणि हीन राहील. "असे आपले मत व्यक्त केले.

ताराबाई शिंदे, दादा धर्माधिकारी, शारदा साठे यांनी स्त्री-पुरुष समतेचा विचार समाजमनात निर्माण व्हावा म्हणून प्रबोधन केले.

७. स्त्रीवादी चळवळ स्त्रीच्या मुक्तीचा लढा :

पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीला सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक या सर्वच बाबतीत दुय्यम स्थानावर ठेवले. तिचे शारीरिक व मानसिक, शोषण करणे, रुढीपरंपरांनी जखडून ठेवणे, लिंगभेद करुन कमी लेखणे, गुलाम बनविणे, गृहकृत्ये व शिशुसंगोपन हे स्त्रीवर ढकलून जबाबदारीतून सुटका करुन घेणे, मातृत्वाचा उदो उदो करुन देवी बनविणे, धर्माच्या नावावर शोषण करणे इत्यादी बाबींमुळे स्त्रीला समाजात वावरतांना आत्मविश्वास, धैर्य निर्माण झाले नाही. ती अविकसीत राहिली म्हणून या अन्यायकारक बाबींमधून स्त्रीला मुक्ती पाहिजे. हा स्त्रीमुक्तीचा लढा म्हणजे विचार व कृती यांचा संगम आहे. स्त्रीवादी चळवळ स्त्रियांमध्ये जागृती, आत्मभान, आत्मविश्वास, हक्क, कर्तव्य, क्षमता यांची जाणीव निर्माण करुन त्या विरोधात लढण्यास प्रवृत्त करतो. कायद्याने जरी स्त्रीला संरक्षण मिळाले तरी पुरुषांची मानसिकता बदलून टाकण्यासाठी स्त्रीवादी चळवळीचा लढा आहे. स्त्रीच्या दृष्टीने गुणात्मक परिवर्तन होणे हे स्त्रीवादी चळवळीला अभिप्रेत आहे.

स्त्रियांच्या हालअपेष्टांना मुठमाती देण्यासाठी अनेक समाजसुधाकरांनी प्रयत्न केले. लोकहितवादी, आगरकर विष्णूशास्त्री पंडीत, विष्णुबुवा ब्रम्हचारी, कृष्णशास्त्री चिपळूणकर, भांडारकर, रानडे, दादोबा पांडुरंग, राजा राममोहन रॉय, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी, रखमाबाई, ताराबाई शिंदे, काशीबाई कानेटकर, कर्वे इत्यादी.

८. अखिल भारतीय महिला परिषदेची स्थापना :

१९२६ मध्ये अखिल भारतीय महिला परिषदेची स्थापना झाली. स्त्रीच्या समस्या, तिच्यावरील अन्याय व अत्याचार, रुढीपरंपरा यांच्यापासून मुक्ती मिळविण्यासाठी व स्त्रीच्या सर्वांगीण प्रगतीसाठी एक हक्काचे व्यासपीठ मिळाल्यामुळे स्त्रियांना आनंद झाला.

अखिल भारतीय महिला परिषदेचे नेतृत्व स्वातंत्र्य चळवळीतील स्त्री नेत्यांच्या हाती आले. सरोजिनी नायडू, रामेश्वरी नेहरु, कमलादेवी चटोपाध्याय इत्यादी नेतृत्वांमुळे स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय शैक्षणिक प्रगतीला गती मिळाली.

१९४७ साली उद्योगधंद्यात राबणाऱ्या व नोकरी करणाऱ्या महिलांची परिषद पुणे येथे भरली. कारकून, शिक्षिका, नर्सेस, गिरणी कामगारातील कष्टकरी स्त्रिया इत्यादीचा समावेश त्यामध्ये होता. महायुध्दानंतर रेशनिंग खात्यातील स्त्रियांची परिषद मुंबई येथे भरली.

२४ तास गृहिणी म्हणून काम करणाऱ्या स्त्रियांची परिषद, शांताबाई मुखर्जी यांच्या पुढाकाराखाली घेतल्या गेली. यामुळे सुखवस्तू कुटुंब ते तळागाळातील स्त्री प्रत्येकाचाच विचार चळवळीने केल्यामुळे ह्या परिषदेचा चेहरा-मोहराच बदलून गेला. परिषद अतिशय व्यापक व सक्रिय झाली.

दुसऱ्या महायुध्दानंतर युनो ही जागतिक संघटना स्थापन होवून भारताच्या प्रतिनिधी म्हणून विजयालक्ष्मी पंडित यांना अमेरिकेतील सॅनफ्रॅन्सिस्को या ठिकाणी पहिल्या अधिवेशनाच्या जनरल असेंब्लीच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला. भारतीय स्त्रियांच्या हक्कांची सन १९५६ साली अखिल भारतीय महिला परिषदेच्या अध्यक्षांनी युनोकडे सादर केली.

त्यानंतर १८ व्या शतकात औद्योगिक क्रांती होऊन भांडवलदाराबरोबर कामगार वर्ग उदयास आला. त्यामध्ये कामगारांचे जीवन अतिशय हलाखीचे होते. कामगार स्त्री व उच्चवर्णीय जीवन व्यतीत करणारी स्त्री या दोन्ही स्त्रीचे जीवन समस्यांनी ग्रासलेले होते. अशा परिस्थितीत तिच्या व्यक्तिमत्वाला धारदार बनविण्यासाठी मानवतेच्या दृष्टीने तिचे हक्क मिळण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स, जर्मन, अमेरिका, जपान, रशिया याठिकाणी चळवळी निर्माण झाल्या.

९. आठ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिवस :

जर्मनमधील स्त्रियांची १० तासांचा दिवस ह्या मागणीसाठी लढा उभारला. त्याचबरोबर इतरही देशात आपल्या मागणीसाठी उदा. समान वेतन, संधी, मतांसाठी संरक्षक तरतूदी, शिशु गृहात वाढ, स्त्री-पुरुष समानता अशा कितीतरी मागण्यासाठी स्त्रिया लढल्या व लढतांना निदर्शने देतांना त्यांना अन्याय अत्याचाराला तोंड द्यावे लागले. सरकारने ह्या कामगारांच्या मागणीला पाठिंबा न दिल्यामुळे त्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी स्त्रियांनी मोठ्या प्रमाणावर निदर्शने दिली. या निदर्शने देणाऱ्या स्त्रियांवर पोलीसांनी लाठीमार, बुटाने बडविणे, तुरुंगात छळ अशा प्रकारच्या यातना दिल्या. स्त्रियांच्या चळवळीच्या इतिहासातील पहिली संघटीत कृती ८ मार्च १९०४ रोजी घडली म्हणून रोझा लक्झेबर्ग यांच्या सूचनेनूसार हा दिवस जगभरात महिला आंतरराष्ट्रीय दिन म्हणून साजरा केला जातो.

१०. भारतीय महिला फेडरेशनची स्थापना व हिंदू कोड बील :

भारतात जुन्या रुढी परंपरेला समाज चिकटून होता. भारतातील अज्ञानी अंधश्रध्दाळू स्त्रीला वारसाहक्क, घटस्फोट, बहुपत्नीकत्व या बाबत एकटीला पाऊल उचलणे त्या काळात कठीण होते. समाजाचे दडपण होते. १९५४ मध्ये कोलकत्ता येथे भारतीय महिला फेडरेशनची स्थापना होवून ती जागतिक आंतरराष्ट्रीय महिला फेडरेशनला जोडून तळागाळातील स्त्रियांचे सर्वांगीण प्रश्न सोडविण्यासाठी सज्ज झाली. या चळवळीत व्यापकता यावी ती सक्रिय व्हावी म्हणून आर्थिक, राजकीय प्रश्न हाताळल्या जावून बिगर राजकीय व पुढारी स्त्रिया एकत्रित येवून काम करु लागल्या व तिच्या अनेक शाखा राज्यात निर्माण झाल्या. या स्त्रियांच्या प्रश्नांना हिंदू कोड बीलाची बळकटी मिळाली. स्त्रियांच्या शोषणाचे चक्र बलदंड झाले होते त्याला काही प्रमाणात आळा बसला.

११. महिला आयोगाची स्थापना :

भारतीय स्त्रीचे जीवन कसे आहे ? स्वातंत्र्यानंतर व निवडणुकीनंतर स्त्रीया जीवनात काही बदल झाले का ? यासाठी महिला आयोगाची स्थापना झाली या संदर्भात कमला भागवत व इतर अभ्यासिका म्हणतात. "घटनेतील समान अधिकार आणि जुजबी सामाजिक सुधारणा देणारे कायदे यातून येथील स्त्रीजीवन खूप बदलले आहे. अशा भ्रमात असणाऱ्या शहरी सुशिक्षित, सुखवस्तू स्त्रिया व त्यांच्या पोशाखी संघटना, यांच्या डोळ्यात 'स्टेटस ऑफ वुमेन इन इंडिया' या स्त्री आयोगाच्या अहवालाने झणझणीत अंजन घातले" असे आपले मत व्यक्त केले.

समाजात आर्थिक विषमता सगळीकडे पोसली गेल्यामुळे आर्थिक विकासाचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत न पोहचल्यामुळे त्यांच्या जीवनामातान काहीही फरक पडलेला नव्हता. महागाईशी सामना करतांना स्त्री मेटाकुटीला आलेली होती. त्यासाठी मोर्चा, निदर्शने,

धरणे, सत्याग्रह, ह्या मार्गाने स्त्रिया महागाईच्या विरोधात पाऊल टाकीत होत्या. अशीच परिस्थिती स्त्रियांची पूर्ण देशात होती. त्यादृष्टीने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष घोषित करण्यात आले.

१२. १९७५ आंतरराष्ट्रीय महिला वर्ष :

भारतातील स्त्रीचे जीवन, हालअपेष्टांचे दुय्यम स्थानाचे, गुलामगिरीचे, शोषणाचे, अन्याय अत्याचारांचे होते. तिच्या कर्तृत्वाकडे, कर्तबगारीकडे समाजाने दुर्लक्ष केले. स्वातंत्र्य मिळूनही कायदा करुनही तिच्या जीवनात पाहिजे तसा बदल आणू शकलो नाही. याची जाणीव निर्माण होण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले. संयुक्त राष्ट्राच्या सभासदाने प्रत्येक राष्ट्रातील स्त्रियांच्या जीवनाची पाहणी करुन त्यात जर काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या दूर करण्यासाठी प्रयत्न करावे. त्यासाठी प्रत्येक देशात महिला संघटनांनी समिती नेमून कार्यक्रमाची आखणी करावी व स्त्री जीवनाचा एकंदरीत आढावा घेतला जावा त्यामुळे वृत्तपत्रे, रेडिओ, टी.व्ही. ह्या प्रसारमाध्यमांच्या सहाय्याने स्त्रियांच्या समस्या नेमक्या हेरुन त्यात बदल करण्याविषयीचे प्रयत्न केल्या गेले.

समितीत प्रत्येक स्त्री आपले विचार मांडत होती व परिवर्तन आणण्यासाठी प्रयत्न करीत होती त्याचठिकाणी धैर्यवान, कर्तबगार महिलांचा सत्कार केला गेला. त्यामुळे इतर महिलांना त्यांच्यापासून प्रेरणा मिळाली. १९७५ ह्या आंतरराष्ट्रीय महिला वर्षात स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिने पावले टाकण्यात आली. वीस कलमी योजना आणल्या जावून स्त्रियांच्या मुलभूत समस्यांची दखल घेण्यात आली.

१३. स्त्रीमुक्तीसाठी विविध संघटनेच्या माध्यमातून स्त्रीवादी चळवळीचे कार्य :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात शैक्षणिक विकासाला चालना मिळाली. समाजात भारताच्या इतिहासात एक नवीन स्त्री, जागृत स्त्री दिसू लागली व घराबाहेर स्थानिक जमातीबाहेर जावून ती संवाद साधू लागली. एतदेशीय व इंग्रजी भाषा त्या स्त्रिया बोलू लाल्या. त्यात पुरुषांची स्त्रियांना काळाच्या बरोबर चालण्याचे आवाहन केले. त्यामुळे स्त्रिया नवनवीन क्षेत्रात, संस्थेत सहभागी होवू लागल्या. संघटनेच्या माध्यमातून स्त्रिया आपले विचार अभिव्यक्त करु लागल्या.

स्थानिक महिला संघटना, प्रादेशिक महिला संघटना, राष्ट्रीय महिला संघटना अशा प्रकारच्या भारतात हजारो संघटना निर्माण झाल्या. भारतीय महिला फेडरेशन श्रमिक महिला संघ, वर्किंग विमेन्स असोसिएशन, पुरोगामी स्त्री संघटना, महिला दक्षता समिती इत्यादी पक्षाशी बांधिलकी ठेवून कार्य करणाऱ्या संघटना आहे तर काही स्त्रियांच्या प्रगतीसाठी न्याय मिळावा म्हणून कार्य करणाऱ्या आहे.

१४. स्त्रीवादी चळवळीची दशाः एक वास्तव शोकांतिका :

प्राचीन काळापासून ते आतापर्यंत स्त्री जाणिवेचा विचार केल्यास असे प्रत्ययास येते की, आजही स्त्रीला सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक दृष्ट्या दूय्यम मानल्या जात आहे. पुरुषांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन एक मादी, उपभोगाचे स्थान असाच आहे. त्यादृष्टीने हत्या, आत्महत्या, अत्याचार या सारख्या समस्यांना स्त्रीला तोंड द्यावे लागत आहे. हुंड्यासाठी स्त्रीचा बळी जात आहे. देवदासी म्हणून देहविक्रीसाठी बाजारात बसविल्या जात आहे. पुरुषांची व्यसनधिनता व वासनाधिनता यामुळे स्त्रीचे जीवन कोलमडून जात आहे. मिडियाच्या माध्यमातून देहप्रदर्शन करण्यासाठी स्त्रीची मानसिकता तयार करण्याचा चूकीचा प्रयत्न केल्या जात आहे. आज स्त्रियांचे लैंगिक शोषण फार मोठ्या प्रमाणात होत आहे. एकतर्फी प्रेमातून नागपूरमधील मोनिका हत्याकांड प्रकरण तर जवखेडा गावातील कौटुंबिक कलहातून जयश्री नावाच्या स्त्रीला मारुन टाकले आहे. त्याचबरोबर दिल्लीतील गाजलेले निर्भयाचे प्रकरण याने संपूर्ण देश हादरून गेला यावरुन असे लक्षात येते की, आजही स्त्रियावरील प्रश्न संपुष्टात आलेले नाही. बीड जिल्ह्यातील स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण वाढलेले आहे. यावरुन समाज स्त्रीला दुय्यम लेखतांना दिसतो. समाजातील अंधश्रध्दा, रुढीपंपरा, नवससायास व्रतवैकल्ये यामुळे स्त्रीच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. लपून छपून हुंडा घेण्याचे व देण्याचे प्रमाण वाढलेले आहे तो न मिळाल्यास स्त्रीला कायमचे सोडुन दिल्याने घटस्फोटीत स्त्रीचे व परित्यक्ता स्त्रीचे प्रमाण आज वाढत जावून कुटुंब विस्कळीत होतांना दिसत आहे. बालविवाह आजही ग्रामीण भागात होतांना दिसत आहे. स्त्रियांचे आरोग्य, मुलांचे कुपोषण सारखे प्रश्न भेडसावित आहे. स्त्रियांची विक्री, अश्लील प्रदर्शन, वेश्याव्यवसाय, कौटुंबिक हिंसाचार, याचे प्रमाण वाढत आहे. त्यात जागतिकीकरणामुळे चंगळवाद उदयास सेवून त्यात स्त्रीचे सर्वांगीण शोषण मोठ्या प्रमाणात होत आहे. वृध्द, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता यांचे उदरनिर्वाहाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. ह्या आणि अशा कितीतरी समस्यांचा सामना स्त्रीला करावा लागत आहे. आज स्त्रीचा विचार केल्यास असे दिसते की, जगाच्या पाठीवर कायम शोषीत, शुद्र व गुलाम राहिलेला वर्ग म्हणजे स्त्री आहे. श्रमविभागणी, पुरुषी वर्चस्व, स्त्री संरक्षणाचे भय, धर्माच्या चुकीच्या कल्पना, आर्य, अनार्य, संघर्ष, मातृसत्ताक कुटुंबपध्दतीचा अस्त ह्यामुळे स्त्रीला दुय्यम स्थान प्राप्त झाले. त्याचे परिणाम आजही स्त्रीला भोगावे लागत आहे. खरं तर सृजनत्वाचे कार्य करणारी स्त्री हिला समाजात मानाचे स्थान मिळायला पाहिजे होते पण ते गौण झाले. ही स्त्री जीवनाची शोकांतिका आहे. त्यादृष्टीने काही उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

समारोप :

स्त्रीला या बंदिस्त जीवनातून मुक्त करण्यासाठी गांधी, फुले, आगरकर, टिळक, रानडे, आंबेडकर, कर्वे, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, आनंदीबाई, काशीबाई कानेटकर यांनी प्रयत्न केले. तसेच स्त्रियांच्या विविध संघटनेमुळे स्त्रीवादी चळवळीचे विचार समाजात रुजण्यास पोषक वातावरण निर्माण झाले तरी स्त्रियांच्या ह्या संघटना फक्त उच्चवर्गापर्यंतच मर्यादीत असल्यामुळे तळागाळातील स्त्रीपर्यंत स्त्रीवादी चळवळ पोहचली नाही याची खंत वाटते. त्यासाठी स्त्रियांनीच आपले कर्तृत्व सिध्द करुन दाखविण्यासाठी एक स्त्रीची नवी प्रतिमा घडविण्यासाठी, घडण्यासाठी पुढे आले पाहिजे. आजही परित्यक्ता स्त्रीचे प्रश्न, हुंडा, अत्याचार लैंगिक शोषण थांबलेले नाही. त्यात परिवर्तन आणण्यासाठी संघटना यशस्वी झालेल्या नाही. अशाप्रकारे संघटनेने आपल्या कार्याचा वेग वाढवावा. स्त्रीवादी चळवळ खालच्या वर्गापर्यंत पोहोचविण्यासाठी भगिणीभाव निर्माण होण्याची गरज आहे. त्यासाठी पुरुषांची अहमंगंडातून सुटका व्हावी व स्त्रीची न्यूनगंडातून सुटका होणे आवश्यक आहे.

उपाय :

१. स्त्रीला, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रात समान संधी, न्याय, हक्क, स्वातंत्र्य, अधिकार मिळावे.
२. समाजातील योनीशुचत्वतेचे महत्त्व निघून जावे.
३. स्त्रियांच्या आरोग्यासाठी विशेष लक्ष पुरविल्या जावे.
४. भ्रुणहत्या, हुंडाबंदी यासाठी कडक नियम करावे.
५. घरातील कामात, बालसंगोपनात पुरुषांचे सहकार्य असावे.
६. मुलीला स्वसंरक्षणाच्या हेतूने ज्यूडो कराटे, कायदा, ड्रायव्हिंग, स्वीमिंग इत्यादी शिक्षण द्यावेत.
७. स्त्रीच्या सक्षमीकरणासाठी तिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यावरच तिचा विवाह करावा.
८. निर्णय प्रक्रियेत, स्त्रीला कुटुंबाच्या सदस्यांनी सहभागी करुन घ्यावे.
९. स्त्रियांची विक्री, अश्लील प्रदर्शन, वेश्याव्यवसाय या विरोधात ठोस उपाययोजना करावी.
१०. स्त्री-पुरुष भेदभावाविरुध्द नवीन कायदे अमलात आणावे.
११. देशाच्या उच्चपदावर आंतरराष्ट्रीय संस्थेत स्त्रीला बरोबरीची संधी मिळावी.
१२. लैंगिक शोषणाविरोधात कडक कायदे अमलात आणावे.
१३. साक्षरता अभियान राबवून तांत्रिक, व्यावसायिक शिक्षणावर भर द्यावा.
१४. शाळेतील मुलींची गळती थांबविण्यासाठी बालविवाह विरोधात आवाज उठविण्यासाठी पुर्नविवाह करण्यासाठी स्त्रियांचे जागृतीपर कार्यक्रम घेण्यात यावे.
१५. पती-पत्नीच्या नावाने (संयुक्तीरित्या) स्थावर मालमत्ता करण्यात यावी.
१६. महिला आधार केंद्राची जागोजागी स्थापना व्हावी. त्याद्वारे त्यांना मूलउद्योगी शिक्षण मिळावे व ते आर्थिक प्रश्न सुटेल अशा उपाययोजना कराव्यात. त्यासाठी काही प्रमाणात सरकारी अनुदान मिळविण्यासाठी प्रयत्न करावे म्हणजे स्त्री नोकरी किंवा अन्य व्यवसाय करु शकेल. आत्महत्येपासून स्वतःला वाचवू शकेल. व वृध्द, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता यांना आधार मिळेल. अशा प्रकारे स्त्रीच्या सबलीकरणासाठी देशातील सर्वांनी मदतीचे एक एक पाऊल टाकल्यास स्त्रीचा विकास नक्कीच होईल अशी आशा वाटते.

सारांश :

मराठी साहित्यात १९६० नंतर विविध साहित्य चळवळी निर्माण झाल्या. ग्रामीण साहित्य चळवळ, दलित साहित्य चळवळ, आदिवासी साहित्य चळवळ विमुक्त भटक्या साहित्याची चळवळ, कामगार साहित्य चळवळ इत्यादी साहित्य चळवळींना १९६० नंतर महाराष्ट्राच्या समाजजीवनावर फार मोठा प्रभाव टाकून आपले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न केले. स्वातंत्र्योत्तर काळातील शोषितांच्या चळवळीचे हे साहित्य असल्याने शोषणातून मुक्त होण्यासाठी या साहित्य चळवळीने पाऊल टाकले. मातृसत्ताक कुटूंबपध्दतीच्या ऱ्हासानंतर स्त्रीचे जीवन मातीमोल झाले. आजही तशीच परिस्थिती आहे. स्त्रीला तिचे हक्क मिळावेत. तिच्या अस्तित्वाचा व अस्मितेचा विचार व्हावा या दृष्टीने स्त्रीवादी चळवळ १९६० नंतर उदयास आली. तिचे बीज आपल्याला १९६० पूर्वीच संत साहित्यातून दिसून येते. पाश्चात्य साहित्य चळवळी यामधून स्त्रीवादी साहित्याची प्रेरणा आपण घेतली. त्यामुळे आपल्या देशात जरी स्त्रीवादाची बीजे असली तरी पाश्चात्य साहित्य व चळवळीच्या माध्यमातून आपण प्रेरणा घेतली. तत्कालीन परिस्थिती अनुसरुन आपण ती स्वीकारली भारतीय स्त्रीवादी चळवळीला हिंदू कोड बिलाने बळकटी आली. त्यात समाजसुधारकांचे योगदान स्त्रीवादी चळवळीला लाभले. स्त्रीला तिचे हक्क, न्याय मिळावा, दुय्यमत्वातून तिची मुक्तता व्हावी माणूस म्हणून तिला वागणुक मिळावी यासाठी अखिल भारतीय महिला परिषदेची स्थापना करण्यात आली. तसेच जर्मनमधील स्त्रियांनी १० तासांचा दिवस ह्या मागणीसाठी लढा उभारला, निदर्शने दिली ; पण पोलीसांनी स्त्रियांना यातना दिल्या त्यांचा निषेध म्हणून ८ मार्च १९०४ हा दिवस आंतरराष्ट्रीय दिन म्हणून साजरा केल्या जातो. तसेच स्त्रियांच्या विकासाला चालना देण्यासाठी, तळागाळातील स्त्रियांचे प्रश्न

सोडविण्यासाठी महिला फेडरेशनची स्थापना करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर व स्वातंत्र्यापूर्वी स्त्रीचे जीवन कसे होते. ह्यासाठी महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. स्वातंत्र्य मिळूनही व कायदा करुनही तिच्या जीवनात पाहिजे तसा बदल आणू शकलो नाही याची जाणीव निर्माण होण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिलावर्ष म्हणून घोषित केले. तसेच स्त्रियांवरील अन्याय अत्याचाराला प्रतिबंध घालण्यासाठी विविध संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केल्या गेले. तरीही स्त्रीच्या विकासात तिला मिळालेल्या वागणुकीत काहीही फरक पडलेला नाही. आजही जवखेडामधील जयश्री सारख्या कितीतरी स्त्रियांचा बळी जात आहे. ही बाब अतिशय स्त्रीच्या दृष्टीने लांच्छनास्पद आहे. जी स्त्री नवनिर्मितीचे कार्य करते तिला मानवाप्रमाणे वागणूक मिळत नाही. ती मिळावी म्हणून स्त्रीवादी चळवळ नेटाने कार्य करीत आहे. तिला गरज आहे पुरुषाची. पुरुषांच्या मानसिकतेत परिवर्तन व्हावे. स्त्रियांशी भगिणीभाव जोपासून स्त्रियांनी सहकार्य करावे त्यासाठी स्त्रीवादी चळवळ कटिबध्द आहे.

निष्कर्ष :

१. जगाच्या पाठीवर कायम शोषीत, शुद्र, गुलाम राहिलेला वर्ग म्हणजे स्त्री.
२. श्रमविभागणी पुरुषी वर्चस्व, स्त्री संरक्षणाचे भय, धर्माच्या चुकीच्या कल्पना, आर्य-अनार्य संघर्ष मातृसत्ताक कुटुंबपध्दतीचा अस्त ह्या गोष्टी स्त्री दुय्यम होण्याला कारणीभूत झाल्या.
३. स्त्रीवाद ही एक स्वातंत्र्यासाठी, अस्मितेसाठी, अस्तित्वासाठी न्यायासाठी, हक्कांसाठी, समानतेसाठी लढणारी माणूसपणाची वागणूक मिळावी म्हणून लढणारी एक चळवळ आहे.
४. त्याग, समर्पण ह्या उच्च कोटीतील कल्पना एकतर्फी स्त्रियांच्याच बाबतीत वापरल्या जावू लागल्यामुळे ती क्रांती करण्यासाठी सज्ज झालेली आहे.
५. प्रगतीला मारक रुढीपंपरा, समाजातील लिंगभेद, पुरुषी वर्चस्व, अंधश्रध्दा, अन्याय, दुय्यम स्थान, गुलामीची वागणूक, रुढी परंपरा, स्त्री एक उपभोगाचे साधन, धर्मांच्या चुकीच्या कल्पना, सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक धार्मिक क्षेत्रातील असणारी असमानता या विरोधात स्त्रीमुक्तीचा लढा आहे.
६. प्रत्येक कालखंडात अन्यायविरोधात स्त्रीने बंड केले आहे पण समाजाने तिच्याकडे दुर्लक्ष केले.
७. पाश्चात्य देशातील जर्मन, फ्रान्स, इंग्लंड, अमेरीका, रशिया ह्या देशातील स्त्रिया आपल्या हक्कासाठी लढल्या.
८. स्त्रीवादी संकल्पना १९६० नंतर भारतात वाङ्मय व चळवळीच्या माध्यमातून भारतात आली व आपण ती जाणिवपूर्वक स्वीकारली.
९. अखिल भारतीय परिषद, हिंदू कोड बील, महिला आयोग, वीस कलमी योजना, विविध संघटनेचे कार्य, कायद्यात बदल, स्थानिक स्वराज्य संस्थेत ५०% राखीव जागा, त्याद्वारे स्त्रियांच्या प्रगतीसाठी प्रयत्न झाले व होत आहे.
१०. मातृत्वामुळे समाजात तिला मानाचे स्थान मिळायला पाहिजे होते. पण ते गौण झाले ही स्त्री जीवनाची शोकांतिका होय.
११. आजही स्त्रीचे जीवन पूर्णपणे विकसीत झालेले नाही. दुय्यमत्वाचा बळी ती जात आहे. शोषणाचे, अन्यायाचे, अत्याचाराचे प्रमाण कमी न होता शोषणाचे चक्र बलदंड होत आहे.
१२. पुरुषांनी आपल्या मानसिकतेत बदल करावे. स्त्रीला माणूस म्हणून स्वीकारावे. याचा स्त्रीवाद स्वीकार करतो.